शुक्रवार दिनांक २१/०८/२०१५ रोजी सकाळी ०१.०० वाजता बांधकाम समिती सभागृह जि.प.सातारा येथे झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत

| सभेची तारीख व वेळ | उपस्थित असलेल्या सभासदाची नावे | |
|---|---|---|
| शुक्रवार दिनांक २१/०८/२०१५ रोजी दुपारी १.०० वाजता | १) मा.श्री.साळुंखे प्रदीप उर्फ रवि सुर्यकांत | सभापती |
| | २) मा.श्री.भोसले राजू अनिल | सदस्य |
| | ३) मा.सौ.पाटील सुरेखा महेंद्र | सदस्या |
| | ४) मा.श्री.कदम राहूल बबनराव | सदस्य |
| | ५) मा.श्री.पवार शशिकात निवृत्ती | सदस्य |
| | ६) मा.श्री.जाधव सदाशिव यशवंत | सदस्य |
| | ७) मा.सौ.घाडगे सावित्रा मानाजी | सदस्या |
| | ८) मा.सौ.शिंदे राधाबाई दिनकर | सदस्या |
| | ९) मा.श्री.जयवंत दिनकर जगताप | सदस्य |

सर्व संबधितांचे उपस्थितीमध्ये मा.सभापती बांधकाम समिती जिल्हा परिषद सातारा यांचे परवानगीने सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

**<u>बांधकाम समिती सभा दिनांक.२१/०८/२०१५ रोजीचे सभेतील दुखवटयाचा ठराव</u>**

भारताचे माजी राष्ट्रपती , मिसाईल मॅन , भारतरत्न डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम (वय – ८४) यांचे सोमवार दिनांक २७/७/२०१५/ रोजी दुःखद निधन झाले.

“त्यांच्या निधनामुळे दुःखी झालेल्या कलाम यांचे कुंटुंबीयांच्या दुःखात ही सभा सहभागी होत आहे.”

“ईश्वर दिवंगताचे आत्म्यास शांती व सद्‌गती देवो.”

**<u>बांधकाम समिती सर्वसाधारण सभा दिनांक.२१/०८/२०१५ रोजीचे सभेतील दुखवटयाच्या ठराव</u>**

कृष्णा खोरे विकास महामंडळाचे माजी उपाध्यक्ष,खटाव तालुक्याचे माजी आमदार,मायणी भाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व उरमोडीचे भगीरथ,खटाव पंचायत समितीचे माजी सभापती व माजी जिल्हा परिषद सदस्य ॲड भाऊसाहेब ऊर्फ मोहनराव पांडुरंग गुदगे (काका) (वय – ७९) यांचे शनिवार दिनांक ८.८.२०१५ रोजी दुःखद निधन झाले.

“त्यांच्या निधनामुळे दुःखी झालेल्या गुदगे यांचे कुंटुंबीयांच्या दुःखात ही सभा सहभागी होत आहे.”

“ईश्वर दिवंगताचे आत्म्यास शांती व सद्‌गती देवो.”

विषय क्रं.१ :- दिनांक २३.०७.२०१५ रोजी झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव क्रं.२०१ :- दिनांक २३.०७.२०१५ रोजी झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणेत आला.

सूचक :- मा.श्री.भोसले राजु अनिल
अनुमोदकः- मा.श्री.जगताप जयवंत दिनकर

**ठराव सर्वानुमते मंजूर**

विषय क्रं.२ :- विविध योजनांच्या कामांचा तालुकानिहाय आढावा घेणे.

ठराव क्रं. २०२ :- विविध योजनेच्या कामांचा तालुकानिहाय आढावा घेणेत आला. तसेच कामे मुदतीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने उप अभियंता यांना आवश्यक त्या सूचना देणेत आल्या. सभेमध्ये झालेल्या चर्चासत्रामध्ये सर्व कामांची ई-निविदा प्रक्रिया पुर्ण करुन २७/१०/२०१५ पर्यंत सर्व वर्क ऑर्डर देऊन कामकाज पुर्ण करण्याची जबाबदारी सचिव यांनी स्विकारली आहे.

सूचक :- मा.सौ.शिंदे राधाबाई दिनकर
अनुमोदक :- मा.श्री.कदम राहुल बबनराव

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.३ :- सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ अंतर्गत मांढरदेव पालन रस्ता ग्रामा ५० सुधारणा करणे ता.वाई रक्कम रुपये २५,००,०००/- अंदाजपत्रकास मंजुरी देणे बाबत.

ठराव क्रं.२०३ :- सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना २०१५-१६ ३०५४ ग्रामीण मार्ग विकास व मजबुतीकरण अंतर्गत जिल्हा नियोजन अधिकारी जिल्हा नियोजन समिती सातारा यांचेकडुन सन २०१५-६ मध्ये जिल्हा परिषदेकडे निधी वितरीत करणेत येणार आहे. तत्पुर्वी प्रशासकिय मंजुरी घेणे गरजेचे आहे त्यामुळे मांढरदेव पालन रस्ता ग्रामा-५० सुधारणा करणे तालुका वाई रक्कम रुपये २५,००,०००/- चे कामास महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे सुधारीत शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०१२/प्र.क्र.६८०/वित्त-९ दिनांक ३१ जानेवारी २०१३ अन्वये ही सभा प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सूचक :- मा.श्री.भोसले राजु अनिल
अनुमोदक :- मा.सौ.पाटील सुरेखा महेंद्र

**ठराव सर्वानुमते मंजुर**

विषय क्रं.४:- मौजे कराड तासगांव रामा क्रमांक १४२ ते शेरे वाल्मिकी पाणंद रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ग्रामा २२५ ता कराड जि सातारा या कामाची श्री दिलीप रामचंद्र चव्हाण मु पो शेरे ता कराड जि सातारा यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) २५.२५ टक्के कमी दराची र.रु.२९,८९,२७३/- ई निविदा स्विकृती बाबत विचार करणे.

ठराव क्रं.२०४ :- गौण खनिज कार्यक्रम सन २०१४-१५ (२८५३ ०१३२) या लेखा शिर्षकाखाली मौजे कराड तासगांव रामा क्रमांक १४२ ते शेरे वाल्मिकी पाणंद रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ग्रामा २२५ तालुका कराड जिल्हा सातारा या कामाची श्री दिलीप रामचंद्र चव्हाण मुक्काम पोष्ट शेरे तालुका कराड जिल्हा सातारा यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा (-) २५.२६ टक्के कमी दराची रक्कम रुपये २९,८९,२७३/- ई निविदा सर्वात कमी दराची असुन ती स्वीकृतीस पात्र आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२६ नुसार व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०१२/प्र क्र.६८०/वित्त-९ मंत्रालय मुंबई दिनांक ३१ जानेवारी २०१३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर कामाची श्री दिलीप रामचंद्र चव्हाण मु पो शेरे तालुका कराड जिल्हा सातारा यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा (-)२५.२६ टक्के कमी दराची रक्कम रुपये २९,८९,२७३/- ची ई निविदा स्विकारणेस ही सभा मंजुरी देत आहे.

सूचक :- मा.श्री.जाधव सदाशिव यशवंत
अनुमोदक :- मा.श्री.जगताप जयवंत दिनकर

ठराव सर्वानुमते मंजुर

ऐ.वे.विषय क्रं.५:-जिल्हा परिषदेचे इमारती मधील भाडेकरुंना सन २०१५-१६ चे दरानुसार व सार्वजनिक बांधकाम विभाग भाडे आकारणी नियमावलीप्रमाणे इमारत भाडे आकारणी करणे बाबत.

ठराव क्रं.२०५ :- सातारा जिल्हा परिषदेच्या मालकीच्या कार्यालयीन इमारतीमध्ये शासकीय कार्यालयांना जिल्हा परिषदेची जागा भाडयाने दिलेली आहे सदरची भाडे आकारणीची निश्चिती सन १९९१ मध्ये केलेली आहे या बाबीस २५ वर्षे झाली असुन भाडे सुधारणा करणे गरजेचे आहे सदर बाबतचे ११ महिन्यासाठी बंधपत्र संबधिताकडुन करुन घेणेत यावे त्यामुळे जिल्हा परिषदेचे उत्पन्न वाढेल तरी दिनांक १/४/२०१५ पासुन सन २०१५-१६ ची भाडे निश्चिती करुन त्याप्रमाणे भाडे आकारणी करणेत यावी.

तसेच थकीत असलेल्या भाडे रकमा वसुल करताना सदर रकमेवर १८ टक्के व्याज आकारणी करणे बाबत विचार विनिमय करणेत येऊन सदर बाबीस मान्यता देणेत आली.

सूचक :- मा.श्री.भोसले राजु अनिल
अनुमोदक :- मा.सौ.राधाबाई दिनकर शिंदे

ठराव सर्वानुमते मंजुर

येणेप्रमाणे विचार विनिमय झालेनंतर मा.जि.प.सदस्य,श्री.जाधव सदाशिव यशवंत यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व सभा संपलेचे जाहिर केले.

| | |
|---|---|
| **सही/XXX** | **सही/XXX** |
| **सचिव** | **सभापती** |
| **बांधकाम समिती जि.प.सातारा** | **बांधकाम समिती जि.प.सातारा** |